सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ६७ | सोमवार, दि. १ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
१ डिसेंबर

- एस.एस. आपटे यांनी हिंदुस्थान समाचार या बहुभाषिक वृत्तसंस्थेची स्थापना केली.
- नागालँड भारताचे 16 वे राज्य बनले.
- भारतीय सीमा सुरक्षा दल (BSF) ची स्थापना झाली.
- मराठी विश्वकोश मंडळाची पुनर्रचना करण्यात आली.
- एड्सचा विषाणू पहिल्यांदा ओळखला गेला.

## निवेदन

हिंदू धर्मातील सर्वात पुण्यदायी व्रतांपैकी एक ओळखली जाणारी मोक्षदा एकादशी सोमवार, दि. १ डिसेंबर २०२५ रोजी सर्वत्र साजरी होईल. या पार्श्वभूमीवर आम्ही आजच्या अंकातील 'मंगल पाना'त मोक्षदा एकादशीचा विविधांगी मजकूर प्रसिद्ध करीत आहोत. याची वाचक, विक्रेते, हिंतचिंतक, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

- संपादक




## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

# व्यापारी बांधव पालिका निवडणुकीत नेमके करणार काय?

## कोणाचे ठेवणार डोके खाली? कोणाचे ठेवणार वर पाय ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वात महत्वपूर्ण असलेल्या व्होट बँकेपैकी एक व्होट बँक असलेली मंडळी म्हणजे व्यापारी मंडळी. कोणत्याही निवडणुकीत यांची भुमिका कलाटणी देणारी अर्थात हवा फिरविणारी व्होट बँक म्हणुनही व्यापारी मंडळींकडे बघितले जाते. व्यापारी बांधवांची व्होट बँक विकाऊ नसून टिकाऊ असल्याने या व्होट बँकेचे महत्व जास्त असते. या व्होट बँकेतून गेल्या काही दिवसांपासून उमटत असलेल्या काहीशा नाराजीच्या सुराच्या पार्श्वभुमीवर त्या सर्वांना एकत्र आणुन मिशन पॅच-अप करण्यासाठीची बैठक शुक्रवार, दि. २८ नोव्हेंबर रोजी श्री. छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात रात्री झाली. ज्यांच्यावर सर्वात जास्त नाराजीचा रोख होता, ते म्हणजेच शहर विकास आघाडीचे नगराध्यक्षपदाचे उमदेवार जितेंद्र ठाकूर यांनी ते पत्रकारिता करीत असताना त्यांच्याकडून झालेल्या चुकांबद्दल उपस्थितांकडे जाहीर माफी मागितली. भविष्यात कुणालाही न दुखावता समाजसेवेसाठी समर्पित राहाण्याचे भावनिक अभिवचन दिले. त्यावर सर्व व्यापारी संघटना एकमुखी पाठिंबा देतील, असेच काहीसे नेत्यांना अभिप्रेत होते. किंबहुना सर्वच क्षेत्रातील व्यापाऱ्यांचा जाहीर पाठिंबा मिळवून जोरदार मुसंडी मारण्याचे शविआचे मनसुबे होते. मात्र, उपस्थित व्यापारी मंडळी एकदम पक्की दिसली. श्री. ठाकूर यांच्या भावनिक आवाहनाला आणि अन्य नेत्यांच्या भाषणांनाही त्यांनी टाळ्या जरूर वाजविल्या. मात्र, मुत्सद्देगिरीने जाहीर पाठिंबा देण्याचे टाळले. अनिलदादांच्या कोणत्याही कार्यक्रमाला उपस्थितीचे आवाहन केल्यानंतर सर्वच क्षेत्रातील मान्यवरांची प्रचंड उपस्थिती असते. त्यात व्यापारी बांधवही खूप मोठ्या संख्येने उपस्थित असतात. २८ नोव्हेंबरच्या व्यापारी बांधवांच्या मेळाव्यात अपेक्षित चेहरे व अंदाजित गर्दी कमी असल्याचे जाणवले. (स्नेह भोजनाला मात्र मोठी गर्दी झाल्याचे कळते. मात्र, त्यात नेमके कोण होते? हे कळाले नाही)



काही मोठ्या व्यापाऱ्यांनी दै. ग्लोबल महातेजशी बोलताना सांगितले, की संपूर्ण देशाचेच राजकारण अस्थिर आहे. केव्हा कोणाची आघाडी होईल? आणि केव्हा बिघाडी होईल ? हे सांगता येत नाही. एका निवडणुकीत एकमेकांच्या विरोधात प्रचार करणारे दुसऱ्या निवडणुकीत हातात हात घालून सोबत प्रचार करतात. या पार्श्वभूमीवर राजकीय कार्यकर्ते देखील आता उघड वाईटपणा घेण्यास टाळत आहेत. आम्ही तर व्यापारी आहोत. ग्राहक म्हणून आम्हाला सर्वच जण हवे असतात. आम्हाला सर्वच बाबींचा विचार करावा लागतो. आम्हाला शिवसेनेने जरी निमंत्रित केले, तरी देखील आमची भुमिका उघड प्रतिक्रिया न देण्याचीच असेल. सद्यस्थितीत आम्ही कोणालाही उघड पाठिंबा न देणेच इष्ट समजतो.

दरम्यान, माजी आमदार शिरिषदादा चौधरी व शिवसेनेचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार डॉ. परिक्षीत बाविस्कर यांनीही जवळपास सर्वच व्यापाऱ्यांशी संपर्क साधला आहे. शिरिषदादांची पालिकेवर सत्ता आल्यास व्यापारी व बिल्डर लॉबिला त्रास दिला जाईल, असा प्रचार शविआतर्फे प्रखरतेने केला जात आहे. त्यामुळे आमची सत्ता आल्यास व्यापाऱ्यांना पालिकेच्या माध्यमातून अपेक्षित असलेल्या सर्व सोयी-सुविधा पुरविण्याचे, त्यांना कोणत्याही प्रकारचा कोणाकडूनही त्रास होणार नाही, याबाबत अभिवचन देवून व्यापाऱ्यांचा विश्वास जिंकण्याचा प्रयत्न शिरिषदादा व डॉ. बाविस्कर यांनी सुरू केला आहे. मात्र, स्वतंत्ररित्या फक्त व्यापारी बांधवांसाठी शिवसेनेने मेळावा घेतला नाही. त्याऐवजी प्रत्यक्ष व्यक्तिगत संपर्कावर त्यांनी भर दिला आहे.


या अटी- तटीच्या लढतीत शहरातील व्यापारी बांधवांचा मोठा कौल कुणाच्या दिशेने झुकला? याचे उत्तर ३ डिसेंबरला मिळेलच.

# निवडणुकीमुळे मटण, मासळी, चिकन व्यवसाय जोरात

## सर्व हॉटेल्स, ढाबे यात ओव्हरलोड गर्दी, नकली दारूची चलती!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रविवार, दि. ३० नोव्हेंबर रोजी अनेकांच्या खिशात पैसे आल्याने त्यातही रविवार असल्याने शहरात मटण, मासळी व चिकन व्यावसायिकांचा रेकॉर्ड ब्रेक व्यवसाय झाला. सोमवार, दि. १ डिसेंबर रोजीही मटण, मासळी आणि चिकन व्यावसायिकांचा मोठा व्यवसाय होणे अपेक्षित आहे. त्या दृष्टीकोनातून संबंधित व्यावसायिकांनी 'माला'ची साठवण करून ठेवली आहे. दरम्यान, शहरातील सर्व हॉटेल्स, परमिट रूम बियर बार, वाईन शॉप, ढाबे येथे ओव्हर लोड गर्दी दिसून आली. यातच खूप मोठ्या प्रमाणावर नकली दारूही विकली गेल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.



असे म्हणतात, की कोणत्याही यशाचा मार्ग पोटातून जातो. त्यामुळे हल्ली तर निवडणूक म्हटले, की जंगी नॉनव्हेज पार्ट्या आणि दारूचा महापूर सर्वत्र काही दिवसांपासून पहावयास मिळत आहेत. त्यातही गेल्या तीन- चार दिवसात तर कहरच झाला आहे. यात नॉनव्हेजशी संबंधित व्यावसायिकांची चांगलीच चलती झाली आहे. या सर्व परिस्थितीचा काही नकली दारू व्यावसायिकांनी पुरेपूर फायदा उचलल्याचे कळते. फुकटाची मिळते आहे, म्हणून अनेक जण त्यांच्या दारू पचविण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त दारू पितात. त्यामुळे आपण काय पितो आहोत? याचे त्यांना भान राहात नाही. ही बाब नकली दारू विक्रेत्यांना अतिशय चांगल्यारित्या माहित आहे. त्यामुळेच त्यांचे चांगलेच फावते.

अनेक हॉटेल्स व ढाब्यांवर दिलेल्या ऑर्डरीप्रमाणे अन्न पदार्थ ताटात येण्यासाठी एक ते दीड तास प्रतिक्षा करावी लागत आहे. अनेक ठिकाणी अत्यंत सुमार दर्जाचे पदार्थ वाढले जात असल्याचेही कळते. मात्र, सारे काही फुकटात असल्याने आणि दारूच्या नशेत बेधुंद असणाऱ्यांना त्याबाबत फारसा आक्षेप नसतो.

चौका- चौकात धुनी करून मतदारांवर लक्ष ठेवण्यासाठी, विरोधी उमेदवार किंवा त्याच्या कार्यकर्त्यांनी पैसे वाटप करण्यासाठी किंवा अन्य कोणत्याही निमित्ताने भेटण्यासाठी आपल्या जवळच्या किंवा कच्च्या- पक्क्या मतदारांशी संपर्क साधू नये, म्हणून अनेक जण रात्रभर जागे राहात आहेत.

निवडणुकीचे जलवे आता पूर्णपणे शिगेला पाहोचले आहेत. काही ठिकाणी अनामिक तणाव, असुरक्षितता आणि विविध प्रकारची भिती असल्याचे जाणवत आहे. काही ठिकाणी अगदी जवळच्या नाते- संबंधात व मित्र परिवारातही वितुष्ट निर्माण झाले आहे. काही ठिकाणी छोटे- मोठे वादही होत आहेत. उमेदवारांइतकीच त्यांचे नेते व समर्थक यांनी यंदाची निवडणूक कमालीची प्रतिष्ठेची केल्याचे स्पष्ट संकेत आहेत.




### अमळनेर पालिका निवडणूक

# मतदानासाठी प्रशासन सज्ज!

## ९७ मतदान केंद्रांवर ५५० कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील पालिका निवडणुकीसाठी मंगळवार, दि. २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. शहरातील ९७ मतदान केंद्रांवर ५५० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदानानंतर दुसऱ्याच दिवशी बुधवार, दि. ३ डिसेंबर रोजी इंदिरा भुवन येथे मतमोजणी होणार आहे.

अमळनेर पालिकेसाठी १ जुलै २०२५ च्या मतदार यादीनुसार ८९ हजार ७५१ मतदान मतदानाचा हक्क बजावणार आहे. अमळनेर पालिकेत एक लोकनियुक्त नगराध्यक्षपदासाठी व १८ प्रभागातील ३६ नगरसेवकपदासाठी निवडणूक होत आहे. पैकी प्रभाग ८ (अ) मधील शविआचे उमेदवार सचिन पाटील हे बिनविरोध झाले आहेत. ३५ नगरसेवक पदासाठी आता मतदान होणार आहे.

महिला मतदान केंद्रांसाठी ६० महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक मतदान केंद्रात दोन बॅलेट युनिट, एक कंट्रोल युनिट राहील. एका मतदान केंद्रात एक केंद्राध्यक्ष, तीन कर्मचारी, एक शिपाई व एक पोलीस कर्मचारी राहील. शहरातील १८ मतदान केंद्र संवेदनशिल असल्याने या केंद्रांवर वेब कास्टिंग होईल. यासाठी अतिरिक्त पोलीस कर्मचाऱ्यांचा तगडा बंदोबस्त करण्यात आला आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी गणेश शिंदे यांनी दिली आहे.

दरम्यान, पालिका निवडणुकीच्या मतदानासाठी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून राज्य राखीव दलाच्या पोलीसांची जादा कूमक तैनात करण्यात येणार आहे. संवेदनशिल मतदान केंद्रांवर दंगा नियंत्रक पथकही तैनात करण्यात येणार आहे.

### ६७ मतदारांनी बजावला पोस्टल मतदानाचा हक्क

पालिका निवडणुकीसाठी इंदिरा भवन येथे पोस्टल मतदान केंद्र ठेवण्यात आले आहे. १०४ कर्मचाऱ्यांचे पोस्टल मतदान आहे. यासाठी शनिवार, दि. २९ नोव्हेंबरपर्यंत ५७ जणांनी पोस्टल मतदानाचा हक्क बजाविला आहे. तर रविवार, दि. ३० नोव्हेंबरला १० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. एकूण पोस्टल मतदान ६७ झाले आहे.

# अमेरिका, चीननंतर भारत बनला जगातील तिसरी सर्वात मोठी शक्ती !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ऑस्ट्रेलियन थिंक टँक लोवी इन्स्टिट्यूटने आशिया पॉवर इंडेक्स २०२५, अहवाल जारी केला. अमेरिका आणि चीननंतर भारत जगातील तिसरी सर्वात मोठी शक्ती बनला असल्याचे अहवालात म्हटले आहे. अहवालानुसार, जलद आर्थिक वाढ आणि वाढत्या लष्करी क्षमतांच्या आधारे भारताने दर्जा प्राप्त झाला आहे. जगात अमेरिका पहिल्या तर चीन दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी शक्ती असल्याचे अहवालात म्हटले आहे. ऑपरेशन सिंदूरमधील भारताच्या कामगिरीने संरक्षण रेटिंगमध्ये वाढ करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. २०२४ मध्ये, भारत ३९. १ गुणांसह मध्यम शक्ती श्रेणीत होता. २०२५ मध्ये, गुण ०. ९ गुणांनी वाढून ४० झाला. ज्यामुळे तो एक प्रमुख शक्ती बनला. भारतानंतर जपान यादीत चौथ्या क्रमांकावर आहे, तर पाकिस्तान १४. ५ गुणांसह १६ व्या क्रमांकावर आहे. अमेरिकेचे एकूण गुण १. २ गुणांनी कमी झाले आहेत. आशिया पॉवर इंडेक्स अहवालासाठी १३१ निकषांवर २७ देशांचे मूल्यांकन केले जाते. यामध्ये संसाधने, अर्थव्यवस्था, लष्करी शक्ती आणि आंतरराष्ट्रीय प्रभाव यांचा समावेश आहे. आशिया खंडाचा भाग नसून देखील अमेरिकेचा या अहवालात समावेश आहे. भारताने गुंतवणुकीत चीनला मागे टाकले. अहवालानुसार, भारत गुंतवणुकीला अधिकाधिक आकर्षित करत आहे. अमेरिकेनंतर भारत दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक परदेशी गुंतवणूक मिळवणारा देश बनला आहे. या बाबतीत भारताने चीनला मागे टाकले आहे.

### भारताला या क्षेत्रांमध्ये फायदा झाला

ऑपरेशन सिंदूरमध्ये मिळालेल्या अनुभवामुळे देशाची संरक्षण क्षमता रेटिंग आणखी मजबूत झाली.भारताने आर्थिक क्षमतेत जपानला मागे टाकून तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे.भारतातील परकीय गुंतवणूक वाढली आहे. ज्यामुळे तो आर्थिक संबंध क्रमवारीत ९ व्या स्थानावर पोहोचला आहे. भारताची अर्थव्यवस्था, कनेक्टिव्हिटी, तंत्रज्ञान आणि लष्करी क्षमतांमध्ये सतत सुधारणा होत आहेत.

# सापांना घरात येण्यापासून रोखण्यासाठी पाच उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिवाळ्याच्या हंगामात साप येण्याचे प्रमाण पावसाळ्याच्या हंगामापेक्षा कमी असले तरी ते पूर्णपणे निष्क्रिय नसतात. ५ घरगुती आणि नैसर्गिक पद्धती आहेत. ज्यामुळे सापांना आपल्या घरापासून दूर ठेवण्यास मदत होईल.

सापांना मारण्याऐवजी किंवा त्यांना इजा करण्याऐवजी त्यांना सुरक्षित अंतरावर ठेवण्यासाठी घरगुती, नैसर्गिक आणि सुरक्षित पद्धती वापरणे चांगले.

**उग्र वास**

सापांना वासाची तीव्र भावना असते. मात्र, त्यांना काही उग्र वास अजिबात आवडत नाहीत. या गंधांचा वापर केल्याने त्यांच्या मार्गात अडथळे निर्माण होऊ शकतात. उदाहरणार्थ, लसूण आणि कांद्यामध्ये सल्फ्यूरिक संयुगे असतात जी सापांना असह्य असतात. म्हणून लसूणच्या काही पाकळ्या बारीक करून तेल किंवा पाण्यात मिसळा. या मिश्रणाची फवारणी प्रवेशद्वाराजवळ, खिडक्या आणि भेगांमध्ये करा जिथे साप प्रवेश करू शकतात. त्याचप्रमाणे दालचिनी आणि लवंगाच्या तेलाचा तीव्र वासही सापांना दूर ठेवतो. या तेलांमध्ये कापसाचे बोळे भिजवून सापांच्या प्रादुर्भावाच्या संभाव्य ठिकाणी ठेवले जाऊ शकतात.

**घराभोवतीची साफसफाई**

साप अनेकदा लपण्यासाठी आणि शिकार करण्यासाठी सुरक्षित, शांत जागा शोधतात. त्यांची लपण्याची जागा काढून टाकली तर ते आपल्या घराजवळ राहणार नाहीत. म्हणून घराभोवती जुने टायर, तुटलेली भांडी आणि कोणत्याही प्रकारचे कचरा त्वरित काढून टाका. बागेतील गवत लहान ठेवा आणि झुडुपे भिंतींपासून दूर कापा. साप बऱ्याचदा उंच गवतात लपतात. जर लाकडाचा ढीग असेल तर तो जमिनीच्या वर आणि घराच्या पायापासून दूर ठेवा.

**घराचा पाया आणि भेगा बंद करणे**

घराच्या भिंती, फरशी आणि पायातील सर्व क्रॅक, छिद्रे सिमेंट किंवा जाळीचा वापर करून पूर्णपणे भरा. दरवाजांच्या खाली मोठे अंतर नाही याची खात्री करा. दरवाजाच्या खाली हवामानाची पट्टी किंवा दरवाजा झाडू घाला जेणेकरून साप आत येऊ शकणार नाहीत. स्वयंपाकघर आणि बाथरूममधील एक्झिट पाईप्स आणि वायुवीजन छिद्रे देखील जाळीने झाकून ठेवा.

पान ३ वर...

# जळगावच्या सुवर्णपेढ्यांना लुटणाऱ्या महिलेस उत्तर प्रदेशातून अटक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव शहरातील तीन नामांकीत सुवर्णपेढ्यांमध्ये महिनाभरापूर्वी हातचलाखी करून सोन्याच्या अंगठ्या चोरणाऱ्या महिलेस पोलिसांनी उत्तर प्रदेशातील बरेली येथून अटक केली आहे. तिच्याकडून जळगावसह छत्रपती संभाजीनगरातून चोरलेला लाखो रुपयांचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे.

सदर महिलेने २७ ऑक्टोबर २०२५ रोजी सर्वांत आधी जळगाव शहरातील रतनलाल सी. बाफना ज्वेलर्समध्ये चोरीचा यशस्वी प्रयत्न केला होता. अंगठ्या ठेवण्याच्या ट्रेमधील सोन्याच्या अंगठ्या काढून त्या जागी तिच्याकडील दोन बनावट अंगठ्या ठेवल्याचे सेल्समन गिरीश जैन यांच्या लक्षात आले होते. त्यानंतर सीसीटीव्हीचे चित्रण तपासले असता सायंकाळी पाचच्या सुमारास एक महिला शोरूममध्ये सोने खरेदीच्या बहाण्याने आली होती. सेल्समन इतर डिझाईनचे ट्रे घेण्यासाठी खाली वाकल्यानंतर तिने स्वतःजवळ असलेल्या दोन बनावट अंगठ्या टॅगसह ठेवून सुमारे एक लाख ८५ हजार रुपये किमतीच्या दोन अस्सल सोन्याच्या अंगठ्या घेऊन पोबारा केला होता.

जळगावातील भंगाळे ज्वेलर्समध्येही २७ ऑक्टोबर रोजी एका महिलेने सायंकाळी साडेपाचच्या सुमारास हातचलाखी करून सुमारे १३ ग्रॅम वजनाची सुमारे एक लाख ४५ हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी चोरली होती. अर्ध्या तासाच्या अंतराने दोन्ही दुकानांमधून जवळपास ३० ते ३५ ग्रॅम वजनाच्या अंगठ्या महिलेने लंपास केल्याचे निदर्शनास आल्यानंतर शनिपेठ पोलीस ठाण्यात महिलेच्या विरोधात दुसरा गुन्हा नोंदविण्यात आला होता. याशिवाय जिल्हापेठ पोलीस ठाण्यात एक नोव्हेंबर रोजी दाखल तक्रारीनुसार जळगावातील पु. ना. गाडगीळ सुवर्णपेढीतूनही एका महिलेने २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहा ते सातच्या सुमारास १० ग्रॅम वजनाची एक लाख ४० हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी चोरल्याचे उघडकीस आले होते. तिन्ही सुवर्णपेढ्यांमधील चोरीच्या घटनांचे साम्य लक्षात घेता एकाच महिलेचा त्यात हात असल्याचा संशय बळावला. त्यादृष्टीने पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रणाच्या आधारे त्या महिलेचा शोध सुरू करण्यात आला.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर येथेही जिप्सी पोलीस ठाण्याच्या हद्दीत आर. सी. बाफना ज्वेलर्समध्ये दोन अंगठ्यांची चोरी झाल्याचा गुन्हा ११ नोव्हेंबरला दाखल झाला होता. या सर्व गुन्ह्यांचे साम्य आणि महिलेचा त्यात सहभाग असल्याची खात्री सीसीटीव्ही चित्रणावरून पटल्यावर जळगावचे पोलीस पथक उत्तर प्रदेशातील बरेली येथे रवाना झाले होते. त्या ठिकाणी लकी शर्मा ऊर्फ लकी शिवशक्ती पाठक या महिलेला ताब्यात घेण्यात आले. तिच्याकडून नमूद गुन्ह्यातील सुमारे ६१.६७ ग्रॅम वजनाच्या आणि सहा लाख ६० हजार रुपये किमतीच्या सहा सोन्याच्या अंगठ्या जप्त करण्यात आल्या.





# गुगलचा मोठा निर्णय

- विशाखापट्टणममध्ये ८८,७३० कोटींची गुंतवणूक
- दरवर्षी १.८८ लाख नोकऱ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारत डिजिटल क्षेत्रात वेगाने प्रगती करत आहे. या दिशेने आणखी एक ऐतिहासिक पाऊल उचलत गुगलने आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे अमेरिकेनंतरचे सर्वांत मोठे डेटा सेंटर स्थापन करण्याची घोषणा केली आहे. हा प्रकल्प भारताच्या डिजिटलायझेशनसाठी मैलाचा दगड ठरेल आणि दरवर्षी लाखो रोजगार संधी निर्माण करेल.

### गुगलची १० अब्ज डॉलरची गुंतवणूक

आंध्र प्रदेश सरकारच्या अधिकृत प्रसिद्धीपत्रकानुसार गुगल १ गिगावॅट क्षमतेचे डेटा सेंटर उभारण्यासाठी १० अब्ज अमेरिकन डॉलर (अंदाजे ८८,७३० कोटी रुपये) गुंतवणूक करेल. ही गुंतवणूक डेटा सुरक्षा, क्लाउड सेवा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) पायाभूत सुविधांना नवीन उंचीवर नेईल. ज्यामुळे भारत जागतिक डिजिटल केंद्र बनण्याच्या दिशेने पुढे जाईल.

### १.१४ लाख कोटींच्या ३० गुंतवणूक प्रस्तावांना मंजुरी

मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या राज्य गुंतवणूक प्रोत्साहन मंडळाच्या बैठकीत १.१४ लाख कोटी रुपयांच्या ३० गुंतवणूक प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये आयटी, इंधन, पर्यटन, अवकाश, अन्न प्रक्रिया आणि इतर क्षेत्रांतील प्रकल्पांचा समावेश आहे. या गुंतवणुकीमुळे राज्यात सुमारे ६७ हजार नवीन रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे. मुख्यमंत्री नायडू म्हणाले, की गेल्या १५ महिन्यांतील आमच्या प्रयत्नांमुळे गुंतवणूकदार आकर्षित झाले असून, राज्यात रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना मिळत आहे. प्रत्येक मोठ्या प्रकल्पासाठी विशेष प्रकल्प अधिकारी नियुक्त करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

### रायडेन इन्फोटेकची सर्वांत मोठी परकीय गुंतवणूक

प्रकाशनानुसार रायडेन इन्फोटेकच्या डेटा सेंटरसाठीच्या ८७ हजार ५२० कोटी रुपयांच्या गुंतवणूक प्रस्तावाला भारतातील सर्वांत मोठी थेट परकीय गुंतवणूक मानले जाते. या प्रकल्पामुळे विशाखापट्टणम जागतिक डिजिटल पायाभूत सुविधांचे केंद्र बनण्यास मदत होईल.

### गुंतवणूक आणि रोजगाराची आकडेवारी

एसआयपीबीच्या आतापर्यंतच्या ११ बैठकींमध्ये ७ लाख कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या गुंतवणूक प्रस्तावांना मंजुरी मिळाली आहे. ज्यामुळे सुमारे ६.२ लाख रोजगार निर्माण होण्याची शक्यता आहे. गुगलचे विशाखापट्टणममधील हायपरस्केल डेटा सेंटर भारताला जागतिक डिजिटल केंद्र म्हणून प्रस्थापित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. या प्रकल्पामुळे दरवर्षी १.८८ लाख रोजगार निर्माण होण्याचा अंदाज आहे, ज्यामुळे स्थानिक आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल.

# महाराष्ट्रातील दुर्गम गावातील मुले फटाफट बोलतात जपानी!

## शेतमजुरांची मुले शिकताहेत रोबोटिक्स; व्हिडिओ व्हायरल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गडिवाट या छोट्याशा गावातील शाळा सध्या देशभरात चर्चेचा विषय ठरत आहे. येथील शाळेतील लहान मुले इंग्रजी किंवा हिंदी नव्हे, तर अगदी फटाफट जपानी भाषा बोलतात. एवढेच नव्हे, तर शेतमजुरांची ही मुले रोबोटिक्ससारख्या आधुनिक विषयांचेही शिक्षण घेत आहेत. ज्यामुळे त्यांचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.



**ग्रामीण भागात परदेशी भाषेचे शिक्षण : एक दुर्मीळ यश**

परदेशी भाषा शिकणे ही आजकाल शहरांमध्ये सामान्य गोष्ट आहे. शहरी शाळा आणि खासगी संस्थांमध्ये परदेशी भाषांचे शिक्षण सहज उपलब्ध आहे. मात्र, ग्रामीण भागात, जिथे मुलभूत शिक्षणासाठीही अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. तेथे परदेशी भाषा शिकणे ही अत्यंत दुर्मीळ बाब आहे. ग्रामीण भागातील मुलांना परदेशी भाषांबद्दल फारशी आवड नसते, असा समज वर्षानुवर्षे प्रचलित आहे. पण गडिवाट गावातील या शाळेने आणि तेथील विद्यार्थ्यांनी हा समज मोडीत काढला आहे.

### शाळेची खासीयत

गडिवाट येथील शाळेत जपानी भाषेचे शिक्षण देण्यासोबतच रोबोटिक्ससारख्या प्रगत तंत्रज्ञानाचे धडे दिले जातात. शेतमजुरांच्या मुलांना अशा आधुनिक शिक्षणाची संधी मिळणे हे खरोखरच कौतुकास्पद आहे. या शाळेने ग्रामीण भागातील शिक्षणाची व्याख्या बदलली आहे. मुलांना जागतिक स्तरावर स्पर्धेसाठी तयार केले जात आहे. गडिवाटच्या या विद्यार्थ्यांनी आणि शाळेने सिद्ध केले आहे, की इच्छाशक्ती आणि योग्य मार्गदर्शन असल्यास ग्रामीण भागातील मुलेही परदेशी भाषा आणि आधुनिक तंत्रज्ञानात प्रावीण्य मिळवू शकतात. त्यांचा हा व्हायरल व्हिडिओ केवळ प्रेरणादायीच नव्हे, तर ग्रामीण शिक्षणातील नव्या शक्यतांचा पुरावा आहे. इतर शाळांनीही याचे अनुकरण करायला हवे.

# दीपिका पदुकोणची बहीण लग्नबंधनात अडकणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पदुकोण कुटुंबात लवकरच सनई-चौघडे वाजणार आहेत. अभिनेत्री दीपिका पदुकोणची बहीण अनिशा पदुकोण लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. अनिशाचे लग्न दुबईतील एका बिझनेसमनशी ठरले आहे. अनिशाच्या सासरच्या मंडळींचे देओल कुटुंबाशी जवळचे नाते आहे. अनिशा पदुकोण काय करते? ती कुणाशी लग्न करणार आहे ? याबद्दल जाणून घेऊया.

दीपिका पदुकोणची बहीण अनिशा पदुकोण हीचे लग्न देओल कुटुंबाचे कनेक्शन असलेल्या रोहन आचार्यशी होणार आहे. रोहन आचार्यची बहीण दृषा आचार्य हीचे लग्न सनी देओलचा मोठा मुलगा करण देओलशी झाले आहे. अनिशा ही लग्नानंतर दृषाची वहिनी होईल. सनी देओल व प्रकाश पदुकोण यांचे व्याही एकच आहेत. रोहन आचार्य हा बिमल रॉय यांचा पणतू आहे. बिमल यांची नात चिमू आचार्य ही रोहन आणि दृषा आचार्यची आई आहे.

**कोण आहे रोहन आचार्य?**

रोहन आचार्य हा दुबईतील एक बिझनेसमन आहे. तो दीपिका पदुकोणची धाकटी बहीण अनिशा पदुकोणचा होणारा पती आहे. अनिशा व रोहन मागील अनेक वर्षांपासून एकमेकांना ओळखतात.

**काय करते अनिशा पदुकोण?**

अनिशा ही एक गोल्फर आहे. तिने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. अनिशा सध्या द लिव्ह लव्ह लाफ फाऊंडेशनची सीईओ आहे. ज्याची स्थापना तिची बहीण दीपिकाने 2015 मध्ये केली होती. या फाऊंडेशनचे उद्दिष्ट मानसिक आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करणे आहे. अनिशाने मानसशास्त्र, समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र या विषयांमध्ये बॅचलर पदवी घेतली आहे. तिने हार्वर्ड बिझनेस स्कूलमधूनही शिक्षण घेतले आहे.

पदुकोण कुटुंब अनिशाच्या लग्नाची तयारी करत आहेत, अशा चर्चा आहेत. अनिशा पदुकोण आणि रोहन आचार्य यांच्या लग्नाची तारीख अद्याप अधिकृतपणे जाहीर झालेली नाही. अनिशा आणि रोहन यांनीही त्यांचे नाते खासगी ठेवले आहे. त्यामुळे लग्नही खासगी समारंभात होण्याची शक्यता आहे.



# मिल्खा सिंग : फ्लाइंग सिखचा जीवनप्रवास

भारताचे महान धावपटू मिल्खा सिंग भारत-पाकिस्तान फाळणीच्या काळात अनाथ झाले. लहानपणीच त्यांनी आई-वडिलांना गमावले. शरणार्थी छावण्यांमध्ये राहताना उपाशीपोटी दिवस जात होते. लष्करात भरती झाल्यानंतर धावण्याची खरी ताकद त्यांना उमगली. १९५८ च्या आशियायी क्रीडा स्पर्धेत आणि १०६० रोम ऑलिम्पिकमध्ये त्यांनी भारताला मान मिळवून दिला. जिद्द, मेहनत आणि शिस्त या त्रिसूत्रीनेच त्यांचा प्रवास घडला.



**प्रेरणा :** अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जगात नावलौकिक कसा मिळवायचा, याचे उदाहरण म्हणजे मिल्खा सिंग.

### पी. व्ही. सिंधू ‘ क्लासरूम किस्सा ’

शाळेत असताना सिंधूला विचारले, की तू इतकी उंच आहेस. बॅडमिंटन कसा खेळतेस? ती म्हणाली, की मी शटल खाली आणते. नेट वर नाही नेत. नंतर ती ऑलिम्पिक पदक विजेती ठरली. मात्र तिचा विनोद अजूनही कायम आहे.



# लंडनच्या रोबोटची वडगाव शेरीत कमाल

## ३०० मीटर आत जाऊन शोधले ४० बेकायदा नळजोड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पुणे महानगरपालिकेने बेकायदा नळजोड आणि पाण्याची गळती शोधण्यासाठी लंडनहून आणलेल्या अत्याधुनिक रोबोटने वडगाव शेरीत कमाल केली. गणेशनगर येथील ५०० मिलिमीटर व्यासाच्या मुख्य जलवाहिनीत ३०० मीटर आत जाऊन या रोबोटने ४० बेकायदा नळजोड आणि दोन ठिकाणी पाण्याची गळती शोधून काढली. पुण्यात प्रथमच अशा रोबोट तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला.

**पार्श्वभूमी आणि समस्येचे मूळ**

वडगाव शेरीला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीवर बेकायदा नळजोडांना बंदी आहे. मात्र, गेल्या वर्षभरात कमी दाबाने, अपुरा आणि अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी होत्या. याचे नेमके कारण शोधण्यासाठी पारंपरिक पद्धती अपयशी ठरल्या. त्यामुळे पाणीपुरवठा विभागाने लंडनच्या रोबोट तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय घेतला.

**रोबोटचे ऑपरेशन**

पाणीपुरवठा विभागाचे अधीक्षक अभियंता वीरेंद्र केळकर, कार्यकारी अभियंता एकनाथ गाडेकर, कनिष्ठ अभियंता नितीन जाधव, रवींद्र वानखेडे आणि रामदास आडारी यांच्या मार्गदर्शनाखाली वडगाव शेरीतील आनंद पार्कजवळ जलवाहिनी खोदून रोबोट कार्यान्वित करण्यात आला. या रोबोटने ४ मीटर खोल जलवाहिनीत प्रवेश करून ४० बेकायदा नळजोड आणि दोन गळती स्थाने शोधली. काही नळजोड इतके खोलवर होते, की रोबोटलाही पुढे जाण्यास अडथळा आला. यामुळे शेजारचे सांडपाणी मुख्य वाहिनीत मिसळून पाणी अशुद्ध होत असल्याचे आढळले.

**प्रभाव आणि भविष्य**

या यशस्वी प्रयोगामुळे पुणे महानगरपालिकेला पाणीपुरवठा सुधारण्यासाठी नवीन दिशा मिळाली आहे. बेकायदा नळजोडांमुळे होणारी पाण्याची नासाडी आणि अशुद्धता रोखण्यासाठी हे तंत्रज्ञान भविष्यात इतर भागांतही वापरले जाण्याची शक्यता आहे.

### रोबोट तंत्रज्ञानाचे वैशिष्ट्य

या रोबोटला चार चाके, कॅमेरा आणि लाइट्स बसविलेले आहेत. तो ३६० अंशात जलवाहिनीचे निरीक्षण करतो. रिमोटद्वारे नियंत्रित केला जातो. पडद्यावर थेट चित्रण दिसते, ज्यामुळे गळती, तडे, कचरा किंवा बेकायदा नळजोड यांची अचूक माहिती मिळते. या तंत्रज्ञानामुळे कमी वेळेत आणि नेमकेपणाने समस्येचे मूळ शोधता येते, असे वीरेंद्र केळकर यांनी सांगितले. आढळलेले ४० बेकायदा नळजोड तातडीने तोडण्यात येणार आहेत.



# बिट्स पिलानी से यूपीएससी टॉपर तक

## सक्सेस स्टोरी : आयएएस संस्कृति जैन की प्रेरक कहानी, सुनहरी पालकी में हुई विदाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मध्य प्रदेश के सिवनी जिले की आयएफएस अधिकारी संस्कृति जैन की कहानी कड़ी मेहनत, लगन और समाज सेवा की मिसाल है। बिट्स पिलानी से पढ़ाई पूरी करने वाली संस्कृति ने पहले ही प्रयास में यूपीएससी पास किया और तीसरे प्रयास में ११ वीं रैंक हासिल कर आयएएस बनीं। सिवनी में उनके शानदार कार्यकाल के बाद उन्हें सुनहरी पालकी में बिठाकर भव्य विदाई दी गई। आइए जानते हैं उनकी प्रेरक यात्रा और उपलब्धियों के बारे में।

**सुनहरी पालकी में भव्य विदाई**

सिवनी जिले में १५ महीने तक कलेक्टर रहीं संस्कृति जैन को भोपाल में नई तैनाती (भोपाल नगर निगम आयुक्त) से पहले भावभीनी विदाई दी गई। उनकी बेटियों के साथ उन्हें सुनहरी पालकी में बिठाया गया और संगीतमय माहौल में रवाना किया गया। यह विदाई उनके जनसेवा और समर्पण के प्रति लोगों के प्रेम का प्रतीक थी।

**कौन हैं आयएएस संस्कृति जैन?**

१४ फरवरी १९८९ को श्रीनगर में जन्मीं संस्कृति जैन का पालन-पोषण एक अनुशासित सैन्य परिवार में हुआ। उनके पिता भारतीय वायुसेना में फाइटर पायलट थे, जबकि मां चिकित्सा विभाग में कार्यरत थीं। पिता के बार-बार ट्रांसफर के कारण संस्कृति ने देशभर के छह अलग-अलग स्कूलों में पढ़ाई की, जिसने उन्हें अनुकूलन और मेहनत का पाठ पढ़ाया।

**बिट्स पिलानी से इंजीनियरिंग, फिर यूपीएससी की राह**

संस्कृति ने बिट्स पिलानी (गोवा कैंपस) से इंजीनियरिंग में ग्रेजुएशन किया। शुरू में उन्होंने पीएचडी करने का विचार किया, लेकिन एक दोस्त के सुझाव पर यूपीएससी सिविल सेवा परीक्षा की तैयारी शुरू की। पहले प्रयास में ही उन्होंने यूपीएससी पास कर लिया। दूसरे प्रयास में उन्हें भारतीय राजस्व सेवा (आयआरएस) मिली, लेकिन वे आयएएस बनना चाहती थीं। तीसरे प्रयास में २०१४ की यूपीएससी परीक्षा में ११ वीं रैंक हासिल कर उन्होंने मध्य प्रदेश कैडर में आयएएस के रूप में चयनित होकर इतिहास रच दिया।

**प्रेरणा का स्रोत :** संस्कृति जैन की कहानी यह सिखाती है कि सही दिशा में मेहनत और लगन से कोई भी लक्ष्य असंभव नहीं। बिट्स पिलानी की इंजीनियरिंग से यूपीएससी टॉपर बनने और सिवनी में जनसेवा तक, उनकी यात्रा हर उस व्यक्ति को प्रेरित करती है जो बड़े सपने देखता है।

### प्रमुख प्रशासनिक भूमिकाएं

मध्य प्रदेश कैडर में शामिल होने के बाद संस्कृति ने कई महत्वपूर्ण पदों पर काम किया.

- रीवा नगर निगम आयुक्त
- सतना में अतिरिक्त कलेक्टर
- मऊगंज में एसडीएम
- अलीराजपुर और नर्मदापुरम में जिला पंचायत सीईओ
- सिवनी में कलेक्टर

अब वे भोपाल नगर निगम आयुक्त के रूप में कार्यरत हैं।

### सिवनी में सराहनीय कार्य: लाडली बहन से लेकर शिक्षा तक

सिवनी कलेक्टर के रूप में १५ महीने के कार्यकाल में संस्कृति ने कई उल्लेखनीय काम किए:

**लाडली बहन योजना का विस्तार :** इसे अटल पेंशन योजना के साथ जोड़कर महिलाओं को आर्थिक रूप से सशक्त किया।

**शिक्षा में सुधार :** सामुदायिक भागीदारी से प्राथमिक स्कूलों में डेस्क और बेंच उपलब्ध कराए।

**जमीनी समावेशिता :** जन कल्याण को प्राथमिकता देकर सामाजिक योजनाओं को प्रभावी बनाया। इन प्रयासों के लिए उन्हें व्यापक प्रशंसा मिली और सिवनी के लोगों के दिलों में खास जगह बनाई।

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# सापांना घरात येण्यापासून रोखण्यासाठी पाच उपाय

पान १ वरून

**उंदीर आणि कीटकांचे नियंत्रण**

साप, उंदीर, सरडे व इतर लहान कीटकांची शिकार करतात. घरात किंवा त्याच्या आसपास उंदरांची संख्या जास्त असेल तर ते सापांना आकर्षित करेल कारण त्यांना सहज अन्न मिळू शकते. उंदीर घरापासून दूर ठेवण्यासाठी घरगुती उपचारांचा प्रयत्न करा किंवा औषधे ठेवा. तृणधान्ये आणि पाळीव प्राण्यांचे अन्न हवाबंद कंटेनरमध्ये ठेवा जेणेकरून कीटक आकर्षित होणार नाहीत.

**'या' पद्धतीही कामी येतील**

काही लोकांचा असा विश्वास आहे, की सापांना मांजर किंवा कुत्र्याच्या केसांचा वास आवडत नाही. हे केस गोळा करा आणि ज्या ठिकाणी आपल्याला साप भेटण्याची शक्यता आहे अशा ठिकाणी ठेवा. प्रवेशद्वाराजवळ गंधकाची फवारणी करणे ही देखील एक पारंपरिक पद्धत आहे. याचा वास सापांना दूर ठेवतो. शिवाय नेप्थलीनचा तीव्र वास सापांना अप्रिय असतो. ते उघड्यावर, कापडात गुंडाळलेले आणि शक्य त्या प्रवेशद्वाराजवळ ठेवू नये.



# रोहित राऊत बनला भारताचा पहिला आय- पॉप स्टार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आय पॉपस्टारच्या सहा आठवड्यांच्या स्पर्धेनंतर रोहित राऊत विजेता ठरला आहे. त्याने भारताचा पहिला आय-पॉप स्टार होण्याचा बहुमान पटकाविला आहे.

रोहितने विजेतेपदासोबत तब्बल ७ लाख रुपयांचे बक्षीस जिंकले आहे. हा त्याच्या करिअरसाठीचा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. रनर-अप ऋषभ पांचाल यालाही ३ लाख रूपयांचे बक्षीस मिळाले आहे. त्यालाही देशभरात ओळख मिळाली. जज किंग म्हणाले, की आय पॉप स्टारने भारतातील पॉप संगीताला भविष्य दाखवले आहे. भारताचे कलाकार ताकदवान, प्रामाणिक आणि बिनधास्त होते. रोहित म्हणाला, की मी येथे माझा आवाज शोधायला आलो आणि विजेता म्हणून उभा राहिलो. यामुळे माझ्या कलागुणांवरचा विश्वास आणखी वाढला आहे. माझ्या मेंटर परमिश पाजींच्या मदतीशिवाय हे शक्य नव्हते. त्याने चाहत्यांचेही मनापासून आभार मानले. रोहितने आपला पुरस्कार सर्व रीजनल आणि इंडिपेंडंट कलाकारांना समर्पित केला आहे. ज्यांना मोठ्या मंचावर आपली स्वप्ने पूर्ण करायची आहेत. त्यांच्यासाठी ही प्रेरणा आहे. परमिश वर्मा म्हणाले, की पहिला आय पॉप स्टार माझ्या टीममधून आला, हे अफाट समाधान देणारे आहे. रोहितची प्रगती पाहणे हा आनंदाचा प्रवास होता. एमएक्स प्लेयर आणि ॲमेझॉन यांनी स्वतंत्र संगीतासाठी भव्य मंच उपलब्ध करून दिले आहे. या शोने भारत इंडिपेंडंट पॉपसाठी सज्ज असल्याचे सिद्ध केले.







# तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# छायाचित्र फ्रेम मेकिंगचा बदलला ट्रेंड

## महाराष्ट्रात कोणाच्या छायाचित्राची विक्री अधिक?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

फ्रेम व्यवसायातही आधुनिकीकरण आलेले आहे. पूर्वीच्या काच, लाकडी पट्ट्यांची चौकट आता हळुहळु विस्मृतीत जात आहे. मधल्या काळात लॅमिशन फ्रेम आल्या होत्या. त्यांचाही जमाना गेला असून, संगणकावर साईज निश्चित करून फ्रेम, छायाचित्र बसवले जाते. आपल्या घरात एखादे सुंदर चित्र असावे, असे प्रत्येकाला वाटते. तशी फ्रेम' निवडली जाते. छायाचित्र किंवा चित्र विक्रीचा कल अलिकडे वाढू लागला आहे.



फ्रेम आणि प्रतिमांमध्ये महाराष्ट्रातली विक्रीची उलाढालही मोठी आहे. पूर्वी देवी देवतांचे चित्र आवर्जून फ्रेम करुन घेतले जात असे. आता तो कल पूर्णतः बदलताना दिसतो आहे. जुन्या काळातील दाभोळकर फ्रेम तर सध्या प्रचलित झालेला क्रिस्टल प्रकार. या शिवाय दोन काचांमध्ये फोटो बसवलेली सँडविच फ्रेम. दुहेरी फ्रेम, कॅनव्हॉस फ्रेम म्हणजे कपड्यावरची, असे अनेक प्रकार बाजारात उपलब्ध आहेत.

फ्रेमच्या दुकानांमध्ये सर्वाधिक मागणी किंवा पसंती कोणत्या चित्राला मिळते, यावर एका फ्रेममेकर ने सांगितले, की शिवाजी महाराजांच्या फोटोला अधिक ग्राहक पसंत करतो. खरेदीही केली जाते. विशेषतः वास्तुशांती अर्थात घरभरणीच्यावेळी महाराजांची भव्य फ्रेम खरेदी केली जाते. अर्थात भेट म्हणून देण्यासाठी आता बाजारात फ्रेममध्ये क्रिस्टल लॅमिनेशन फ्रेमचा जमाना सुरू आहे. क्रिस्टल फ्रेम ही काचेचा आभास निर्माण करणारी आहे. प्रत्यक्षात काच नाही, पण चमक आहे. यामध्ये रेक्झिन क्रिस्टल प्रकार आहे. महाराजांचा टोप, टेकून बसलेला लोड, अंगावरील अलंकार, यावर स्टोन वर्क केलेले असते. या क्रिस्टल फ्रेममधील महाराजांची प्रतिमा कमालीची विलोभनीय दिसते. पाहणाऱ्याची नजर खिळून राहते. फ्रेममध्ये लाकडांसह फायबरचेही नवे प्रकार आहेत. त्याच्या चौकटीतील प्रतिमा आकर्षित करते.

अगदी एक इंच रुंदीपासून ते चार इंचांपर्यंत रुंद फ्रेम मिळतात. लाकडी व फायबर प्रकारातल्या या फ्रेम आहेत. एका विक्रेत्याने सांगितले, की माझ्याकडील एकूण फ्रेममध्ये ६५ ते ७० टक्के फ्रेम या फक्त शिवाजी महाराजांच्याच आहेत. स्टोनवर्क केलेली महाराजांची फ्रेम नवे आकर्षण आहे. सर्वाधिक खरेदी ही महाराजांच्याच प्रतिमेची होते. दुसऱ्या क्रमांकावर राधा-कृष्णाच्या फ्रेमची विक्री होते. त्यानंतर गणपती व इतर महापुरूष, संत, साईबाबा, स्वामी समर्थ. शिवाजी महाराजांच्या फोटोसाठी आता बॉक्स फ्रेम हा नवा प्रकार आला आहे. त्याची रचना मंदिरासमान आहे. दोन्ही बाजूंनी खांब व लामण दिव्यासारखी लटकती घंटी. पोट्रेट आकारातील महाराजांचे छायाचित्र मंदिरासारख्या भागात बसवलेले दिसते. महाराजांच्या फ्रेमला चांगलीच पसंती मिळते. २५ हजार रूपयांपर्यंत फ्रेम आहेत.

# साने गुरुजी पतसंस्थेच्या संचालकपदी तेले बिनविरोध

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील जी.एस. हायस्कूलचे उपशिक्षक रोहित तेले यांची साने गुरूजी माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर पतसंस्थेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाली आहे.

याप्रसंगी माध्यमिक शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष सुशील भदाणे, संचालक तुषार बोरसे, महेश नेरपगारे, सविताताई बोरसे, प्रा. मंदाकिनी भामरे, संजीव पाटील, संजय पाटील, महेंद्र पाटील, हिरालाल पाटील, सेवानिवृत्त केद्रप्रमुख बन्सीलाल भागवत, साने गुरुजी कन्या हायस्कूलचे शिक्षक मुकेश पाटील, सेवानिवृत्त पर्यवेक्षक एस. सी. तेले, बाजार समितीचे संचालक समाधान धनगर, रमेश देव, भाजप युवा मोर्चाचे देवा लांडगे, आनंद धनगर, खा.शी. मंडळ संस्थेचे पदाधिकारी व शिक्षक उपस्थित होते. सामाजिक रवींद्र पितांबर पाटील, कपिल पाटील, पत्रकार ईश्वर महाजन आदींनी रोहित तेले यांचे अभिनंदन केले आहे.

याप्रसंगी श्री. तेले म्हणाले, की ही फक्त माझी एकट्याची निवड नाही, पतसंस्थेच्या सर्व सभासदांची आहे. संचालक मंडळ, सभासदांच्या सहकार्याने शिक्षण आणि सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देईल. पतसंस्थेच्या संचालक मंडळाने माझ्यावर विश्वास टाकला आहे, या सर्वांचा मी ऋणी आहे.

## प्रभाग १ (अ) ची निवडणूक प्रक्रिया लांबणीवर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील पालिकेतील प्रभाग क्र. १ (अ) मधील इच्छुक उमेदवार सौ. इंदिरा प्रवीण पाटील यांचा उमेदवारी अर्ज बाद झाल्याने त्यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली होती. या पार्श्वभूमीवर ही निवडणूक लांबणीवर पडली आहे. प्रभाग १ (अ)साठी माघारीपासून आता नवीन प्रक्रिया सुरू होईल, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी रुपेशकुमार सुराणा यांनी दिली आहे.

# कोथिंबीर महिनाभर ताजी कशी ठेवावी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कोथिंबीरचा उपयोग सर्वच भाज्यांमध्ये केला जातो. डिश सजविण्याकरिता कोथिंबीर मोठ्या प्रमाणात वापरली जाते. कोथिंबीर दीर्घकाळ टिकून राहण्याकरिता काही सोप्या स्टेप्स आहेत त्या जाणून घ्या. कोथिंबीरमध्ये असलेली माती धुळ आणि ओलसर कण काढण्यासाठी कोथिंबीर थंड पाण्याने चांगली धुवून घ्या. पाणी काढून टाकणे धुतल्यानंतर कोथिंबीर चाळणीत ठेवा.



जेणेकरुन कोथिंबीरमध्ये असलेले पाणी निघून जाईल. कोथिंबीरमध्ये जर ओलसरपणा राहिला तर कोथिंबीर लवकर कुजते. जास्त जाड असलेले देठ काढून टाका. फक्त कोवळी पाने बारिक देठ ठेवा. एका एअरटाईट बॉक्समध्ये पेपर टॉवेलची लेयर बनवा. यावर कोथिंबीर ठेवा. पेपर टॉवेल कोथिंबीरचा ओलसरपणा शोषून घेईल आणि जास्त काळ टिकेल. कोथिंबीर पेपर टॉवेल वर ठेवल्यावर पुन्हा वरच्या थरावर पेपर टॉवेल ठेवा. ही पेपर टॉवेलची डबल लेयर कोथिंबीरचा ताजेपणा वाढवते. कोथिंबीर हलक्या हाताने पसरवून ठेवा. पसरवून ठेवल्यास कोथिंबीरची पाने ताजी राहतात. कोथिंबीरचा एअरटाईट बॉक्स फ्रिजच्या व्हेजिटेबल सेक्शनमध्ये ठेवल्यास कोथिंबीर सहज १ महिना ताजी राहील.

# अधिकाऱ्याला संशय आला अन् १११ कोटींचा घपला उघड

## चेक खरोखर 'त्या' विभागातून देण्यात आला होता का ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वेळेवर बिले मिळत नसल्याने राज्यातील असंख्य कंत्राटदार त्रस्त आहेत. यामुळे काही कंत्राटदार इतके त्रस्त झाले आहेत, की आर्थिक परिस्थिती कोलमडल्याने त्यांनी आपले जीवन संपविले होते. या पार्श्वभूमीवर पालघर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत विविध कामे करणाऱ्या कंत्राटदारांची मोठी फसवणूक टळली आहे. त्यामुळे या कंत्राटदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. कंत्राटदारांनी जमा केलेल्या रकमेचा घोटाळा करण्यात येणार होता. मात्र, एसबीआयच्या एका सतर्क अधिकाऱ्यामुळे हा घोटाळा होण्यापूर्वीच उघडकीस आला. ज्यामुळे कंत्राटदारांचे तब्बल १११. ६५ कोटी रूपये घोटाळेबाजांनी हडप करण्यापासून वाचले आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत होणाऱ्या कामासाठी कंत्राटदाराला अनामत रक्कम जमा करावी लागत असते. दरवर्षी कंत्राटदारांना कोट्यवधींची कामे दिली जातात. त्यामुळे त्यांच्याकडून जमा केलेल्या एकूण अनामत रकमेचा आकडा हा मोठा असतो. कामाच्या एकूण रकमेच्या १ ते ५ टक्क्यांपर्यंतची रक्कम कंत्राटदारांना जमा करावी लागते विकासकामे पूर्ण झाली आणि तसा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अभिप्राय मिळाला, की अनामत रक्कम कंत्राटदाराला परत केली जाते. मात्र अनेकदा कंत्राटदार ही रक्कम परत घेण्यास दिरंगाई करत असतात. त्यामुळे ही रक्कम आणि त्यावरील व्याज अशी बँकेत जमा असलेली रक्कम फुगत जाते.

जव्हारच्या स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये एका व्यक्तीने १११ कोटी ६५ लाख रुपयांचा डीडी काढण्यासाठी अर्ज केला होता. त्यासाठीचा चेक आणि इतर कागजपत्रेही देण्यात आली होती. इतक्या मोठ्या रकमेचा डीडी का काढला जातोय असा प्रश्न बँक अधिकाऱ्याला पडला होता. डीडी काढण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचा कर्मचारी आला असल्याचे कळाल्यानंतर क्याला अधिकच संशय आला. त्याने डीडीबद्दलची पडताळणी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय गाठले. बँक अधिकाऱ्याने डीडीसाठी दिलेल्या चेकबद्दल विचारले असता आपण कोणताही चेक दिला नसल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नावाखाली देण्यात आलेला चेक हा खरोखर त्या विभागातून देण्यात आला होता का ? असेल तर त्यावर सही कोणाची होती या सगळ्या बाबी तपासल्या जात आहेत. सह्या खोट्या केल्याचे दिसून आल्यास हा तपास आणखी खोलवर करण्याची गरज भासणार आहे. यामुळे या सगळ्या प्रकारासाठी सार्वजनिक बांधकाम विभागातील कोणीतरी कर्मचारी किंवा अधिकारी जबाबदार असावा असा संशय व्यक्त करण्यात येत आहे. डीडीद्वारे रक्कम वळवून ती ओवी कन्स्ट्रक्शन कंपनीच्या एचडीएफसी बँकेच्या विक्रमगड शाखेच्या खात्यामध्ये जमा करण्याचा कट होता, असा संशय व्यक्त केला जात आहे. ओवी कन्स्ट्रक्शन कंपनी ही इथल्या एका राजकीय नेत्याच्या जवळच्या नातेवाईकाची असल्याचे कळते.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.



॥ मंगल पान ॥

**मोक्षदा एकादशी**

# आत्मशुद्धी आणि मोक्षप्राप्तीचा सोहळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात एकादशीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. वर्षभरात चोवीस एकादश्या येतात आणि प्रत्येकाची आपली एक विशेष कथा, उपासना पद्धती आणि फलश्रुती सांगितली गेली आहे. त्यापैकी मार्गशीर्ष शुक्ल पक्षातील ' मोक्षदा एकादशी ' ही सर्वश्रेष्ठ मानली जाते. तिच्या नावाप्रमाणेच ती मोक्ष प्रदान करणारी एकादशी आहे. या दिवशी भगवान श्रीविष्णूची उपासना केल्यास केवळ साधकच नव्हे, तर त्याचे पितर, कुल आणि संपूर्ण वंश पावन होतो, असे शास्त्रात वर्णन आहे.

### मोक्षदा एकादशीचे पुराणातील महत्त्व

मोक्षदा एकादशीचा उल्लेख स्कंदपुराण आणि पद्मपुराण यांसारख्या ग्रंथांत सविस्तर आढळतो. श्रीकृष्णाने अर्जुनाला या व्रताचे महत्त्व सांगताना म्हटले की "अर्जुना, या दिवशी जो भक्त उपवास, जप आणि ध्यान करतो, त्याच्या पूर्वजांचा उद्धार होतो. पापाचा नाश होऊन आत्मा मुक्तीच्या मार्गावर प्रवास करतो." एक प्राचीन आख्यायिका सांगते की चंपकवन नावाच्या राज्यात वैखानस नावाचा धर्मनिष्ठ राजा राज्य करत होता. एके दिवशी त्याने स्वप्नात पाहिले की त्याचे दिवंगत वडील नरकात यातना भोगत आहेत. दुःखी होऊन राजाने ऋषी वसिष्ठ यांना विचारले. त्यांनी सांगितले की, "हे राजन, तुझ्या पित्याचा उद्धार फक्त मोक्षदा एकादशीचे व्रत केल्याने होईल." राजाने भक्तिभावाने व्रत केले आणि त्याचे वडील स्वर्गलोकात गेले. म्हणून ही एकादशी पितरांच्या उद्धाराची मानली जाते.

### गीता जयंतीचे पावन योग

मोक्षदा एकादशीचा आणखी एक अद्भुत योग म्हणजे भगवद्गीता जयंती. महाभारताच्या युद्धभूमीवर कुरुक्षेत्रात श्रीकृष्णाने अर्जुनाला जे दिव्य ज्ञान दिले त्या भगवद्गीतेचा उपदेश हाच दिवस मानला जातो. त्यामुळे या दिवशी केवळ उपवासच नव्हे, तर गीता पारायण, ध्यान आणि कर्मयोगाचे आचरण विशेष महत्त्वाचे ठरते. गीता शिकवते की ' कर्तव्य कर, फळाची अपेक्षा ठेवू नकोस. ' मोक्षदा एकादशीच्या दिवशी ही शिकवण अधिक तेजस्वीपणे मनात रुजवावी. कारण मोक्ष म्हणजे केवळ मृत्युनंतरची स्थिती नसून, जीवनात असतानाच मनातील आसक्ती आणि अज्ञान यांपासून मुक्त होणे हा खरा मोक्ष आहे.




### व्रतविधी आणि उपासना

मोक्षदा एकादशीच्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान केल्यानंतर शुद्ध वस्त्र धारण करावीत. घरातील देव्हाऱ्यात किंवा मंदिरात भगवान श्रीविष्णू व तुलसीदेवीची पूजा केली जाते.

### तुलसीपत्र, धूप, दीप, फुले आणि नैवेद्य अर्पण करतात.

दिवसभर शक्यतो उपवास करावा; ज्यांना उपवास शक्य नसतो त्यांनी फळाहार करावा. ' ॐ नमो भगवते वासुदेवाय" किंवा "विष्णवे नमः ' या मंत्रांचा जप दिवस भर करावा. संध्याकाळी आरती करून दानधर्म, अन्नदान किंवा वस्त्रदान केल्यास अधिक पुण्य मिळते. अनेक ठिकाणी या दिवशी गीता पारायण, कीर्तन आणि विष्णु सहस्रनाम पठण यांचे आयोजन केले जाते. रात्री जागरण करून प्रभूच्या नामस्मरणाने दिवसाचा शेवट केला जातो.

### आध्यात्मिक अर्थ आणि आजच्या काळातील संदेश

मोक्षदा एकादशी हा केवळ धार्मिक विधी नसून आध्यात्मिक आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात मनुष्य भौतिक सुखांच्या मागे धावत असतो. पण खरे समाधान बाह्य वस्तूंमध्ये नाही, तर अंतःकरणाच्या शांततेत आहे. ही शांतता साधण्यासाठी मन, वाणी आणि कर्म यांचे शुद्धीकरण आवश्यक आहे. एकादशीचे व्रत आपल्याला संयम, शिस्त आणि भक्तिभाव शिकवते. अन्नावरील संयम म्हणजे केवळ शरीरशुद्धी नव्हे, तर इंद्रियसंयमाचे प्रतीक आहे. जेव्हा आपण इच्छा, लोभ, क्रोध, मत्सर, अहंकार या मानसिक विकारांवर नियंत्रण मिळवतो, तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने ' मोक्ष ' अनुभवू लागतो. या दिवशी आपण आपल्या पितरांच्या आठवणीने त्यांच्यासाठी प्रार्थना करतो, त्यांच्या आत्मशांतीसाठी दानधर्म करतो. यामधून आपल्याला कृतज्ञतेचा आणि कुटुंबीय भावनेचा संस्कार लाभतो.



# गीता जयंती : ज्ञान, धर्म आणि आत्मोद्धाराचे दिव्य पर्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गीता जयंती हा हिंदू धर्मातील अतिशय पावन आणि ज्ञानमय उत्सव आहे. या दिवशी भगवान श्रीकृष्णांनी कुरुक्षेत्राच्या रणांगणावर अर्जुनाला श्रीमद्भगवद्गीतेचे दिव्य उपदेश दिले. मार्गशीर्ष महिन्यातील शुक्लु पक्षातील एकादशी जिला मोक्षदा एकादशी असेही म्हणतात. या दिवशी गीता जयंती साजरी केली जाते.

### इतिहास आणि पार्श्वभूमी

महाभारतात युद्धाच्या आरंभी जबाबदाऱ्या, कर्तव्य आणि आप्तस्वजनांवरील माया यामुळे अर्जुन संभ्रमात पडला. त्यावेळी भगवान श्रीकृष्णांनी त्याला गीता या अमोघ ग्रंथाच्या माध्यमातून जीवनाचा, कर्तव्याचा आणि अध्यात्माचा सार दिला. त्यात आत्मस्वरूप, कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग, धर्म, अध्यात्म, जीवनमूल्ये आणि मोक्ष या सर्व विषयांचा सखोल विचार आहे. म्हणूनच भगवद्गीता ही मानवजातीसाठी कालातीत आणि सार्वत्रिक मार्गदर्शक आहे.

### गीता जयंतीचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व

**१) आत्मज्ञानाचा संदेश**
गीता आपल्याला सांगते की मनुष्य हा देह नसून शाश्वत, अविनाशी आत्मा आहे. या जाणिवेमुळे जीवनातील भीती, गोंधळ आणि अज्ञान दूर होते.

**२) कर्तव्यनिष्ठ कर्म**
' कर्मण्येवाधिकारस्ते ' या गीतेच्या संदेशानुसार फळाची अपेक्षा न ठेवता कर्तव्यनिष्ठपणे केलेले कार्यच जीवनात यश आणि शांती देणारे आहे.

**३) भक्ती व समर्पण**
जीवनातील संकटे, दुःख आणि संघर्षांचा सामना भक्ती, श्रद्धा आणि ईश्वरसमर्पणाने अधिक सहजतेने करता येतो.

### गीता जयंतीचे पारंपरिक सोहळे

**१) गीता पारायण**
मंदिरात, घरी किंवा सामूहिक स्थळी संपूर्ण भगवद्गीतेचे वाचन केले जाते.

**२) यज्ञ, हवन आणि पूजन**
मोक्षप्राप्ती व विश्वशांतीसाठी विशेष हवन आणि पूजा केली जाते.

**३) प्रवचने आणि सत्संग**
गीतेच्या विविध अध्यायांवर आध्यात्मिक गुरू आणि विद्वान मार्गदर्शन करतात.

**४) सांस्कृतिक कार्यक्रम**
कुरुक्षेत्र युद्ध, कृष्ण-अर्जुन संवाद, गीता श्लोक स्पर्धा, नाट्यप्रयोग यांचे आयोजन.

**५) कुरुक्षेत्र यात्रेचे महत्त्व**
अनेक भक्त कुरुक्षेत्रला जाऊन पूजन, स्नान आणि महायज्ञांमध्ये सहभागी होतात. तेथे मोठ्या प्रमाणावर मेळे आणि सांस्कृतिक कार्यक्रम भरतात.

### आधुनिक जीवनातील गीतेची उपयुक्तता

आजच्या वेगवान आणि तणावग्रस्त जीवनात गीतेचा संदेश अधिक महत्त्वाचा आहे.
- तणाव नियंत्रण
- मानसिक शांतता
- कर्तव्य आणि संतुलन
- आत्मविश्वास आणि जीवनशैली
- नैतिकता, नेतृत्व, आणि न्याय

गीता आपल्याला जीवनातील अडचणींना धैर्य, संयम आणि विवेकाने सामोरे जाण्याची प्रेरणा देते. गीता जयंती हा दिव्य ज्ञानाचा उत्सव आहे. या दिवशी आपण गीतेचे चिंतन करून आपल्या जीवनातील अंधाऱ्या कोपऱ्यांना प्रकाशमान करू शकतो. भगवान श्रीकृष्णांचे उपदेश हे केवळ धर्मग्रंथ नव्हे, तर जीवनाला दिशा देणारे तत्त्वज्ञान आहे.

**' गीता वाचू, गीता समजू, आणि गीतेचा मार्ग आचरणात आणू.'**
**जय श्रीकृष्ण!**

# मोक्ष, शांती आणि पितृकल्याणाचा महामार्ग

**जाणून घ्या पावन मोक्षदा एकादशी व्रताचे रहस्य, महत्त्व आणि परंपरा**



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू पंचांगातील सर्वांत पुण्यदायी आणि गूढ व्रतांपैकी एक म्हणजे मोक्षदा एकादशी. यावर्षी २०२५ मध्ये हा पावन दिवस १ डिसेंबर, सोमवार रोजी येत आहे. मार्गशीर्ष महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशीला ' मोक्षदा ' असे नाव देण्यात आले आहे, ज्याचा अर्थच मोक्ष प्रदान करणारी असा आहे. असे मानले जाते, की या दिवशी भगवान विष्णूंची उपासना, सत्यनिष्ठ उपवास आणि सद्कर्मांनी व्यक्तीला जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्ती मिळते. या विशेष दिवशी पितरांचे उद्धार, गीतेचे ज्ञान, जैन परंपरेतील मौन साधना आणि शिव-विष्णू उपासनेची संगती एकाच वेळेस येत असल्याने याचा आध्यात्मिक महिमा अनेक पटींनी वाढतो.

### मोक्षदा एकादशीची तिथी

- ३० नोव्हेंबर : रात्री ९:२९ वाजता सुरू.
- १ डिसेंबर : रात्री ७:०१ वाजता समाप्त

उदयातिथी १ डिसेंबर असल्याने व्रत, पूजा आणि सर्व धार्मिक विधी त्या दिवशीच केले जातील. सोमवारचा दिवस शिवपूजेसाठी शुभ मानला जातो आणि मोक्षदेवी विष्णूंची उपासना या दिवशी विशेष फलप्रद असते. त्यामुळे २०२५ मध्ये शिव-विष्णू उपासनेचा दुहेरी योग साधत असल्याने ही एकादशी आणखी पवित्र समजली जात आहे.

### मोक्षदा एकादशीची कथा आणि मोक्षमार्गाचे रहस्य

ग्रंथांनुसार, मोक्षदा एकादशीच्या दिवशी व्रत ठेवणाऱ्यांचे पापांचे क्षालन होते. जीवनात शांती, समृद्धी आणि सौभाग्य वाढते. तसेच मृत पितरांना सद्गती व मोक्षप्राप्ती होते. पौराणिक कथा सांगते, की एक राजा आपल्या पित्यास नरकात दुख भोगताना पाहून व्यथित होतो. ऋषींच्या मार्गदर्शनानुसार त्याने मोक्षदा एकादशीचे व्रत केले आणि त्याच्या पुण्यफळामुळे पित्याची मुक्ती झाली. यातूनच हे व्रत पितृमोक्षदायी म्हणून प्रसिद्ध झाले.

### गीता जयंतीचा पवित्र योग

मोक्षदा एकादशीचा दिवसच भगवद्गीतेचा जन्मदिवस, म्हणजे गीता जयंती म्हणूनही ओळखला जातो. महाभारताच्या कुरुक्षेत्र रणांगणावर भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला या दिवशीच दिव्य ज्ञान दिले, असा विश्वास आहे. या दिवशी गीतेचे संपूर्ण पठण, ११ व्या अध्यायाचे वाचन, प्रवचन, कीर्तन, ध्यान, सत्संग आणि अध्यात्मिक चर्चा यांचे आयोजन देशभरात मोठ्या प्रमाणावर केले जाते.

### जैन परंपरेतील मौन एकादशी : आत्मचिंतनाचा दिवस

जैन धर्मात ही एकादशी मौन एकादशी म्हणून पाळली जाते. जैन साधू-साध्वी तसेच श्रद्धाळू संपूर्ण दिवस मौन धारण करतात, उपवास करतात, संयमाचे पालन करतात, ध्यान, स्वाध्याय आणि प्रार्थना करतात. पावापुरीसह अनेक जैन तीर्थक्षेत्रांमध्ये हजारो श्रद्धाळू हा दिवस आत्मसाधनेसाठी अर्पण करतात. त्यांच्या मते, हा दिवस शरीर आणि मन दोन्हीला शुद्ध करण्यासाठी अत्यंत फलदायी असतो.

**पूजा-विधी :** मोक्षमार्गाकडे नेणारी अभ्यासपूर्ण साधना.

### मोक्षदा एकादशीच्या दिवशी पूजा-विधी खालीलप्रमाणे केली जाते.

- पहाटे स्नान करून पिवळे वस्त्र परिधान करणे.
- भगवान श्रीहरी विष्णू, लक्ष्मी आणि श्रीकृष्ण यांची पूजा.
- पिवळी फुले, तुळस, धूप, दीप आणि फल अर्पण.
- दिवसभर उपवास किंवा फलाहार.
- सायंकाळी गीता वाचन किंवा विष्णुसहस्रनाम जप.

दुसऱ्या दिवशी द्वादशीला ब्राह्मणांना भोजन आणि दान करून व्रताचे पारण. धार्मिक मान्यतेनुसार व्रताचे पारण योग्य रीतीने केल्यासच व्रताचे फळ संपूर्ण मिळते.

### आधुनिक समाजातील मोक्षदा एकादशीचा अर्थ

आजच्या तणावग्रस्त आणि धकाधकीच्या जीवनात मोक्षदा एकादशी फक्त धार्मिक परंपरा नसून आत्मिक शुद्धी, मनःशांती, पितृस्मरण, ध्यान, आणि आध्यात्मिक उन्नती यांचे प्रतीक म्हणून समाजात महत्त्व मिळवत आहे. तरुण पिढी यात मनन, ध्यान, गीता पठन आणि सकारात्मक जीवनशैलीचा स्वीकार करते. अनेक शहरांमध्ये गीता प्रवचन, योग सत्रे आणि आध्यात्मिक चर्चांचे आयोजनही केले जाते.

**(टीप : या लेखातील माहिती पारंपरिक मान्यता, धार्मिक ग्रंथ आणि श्रद्धांवर आधारित आहे. यांची पूर्ण सत्यता किंवा वैज्ञानिक प्रमाणिकता याबाबत आम्ही कोणताही दावा करत नाही. कोणतेही धार्मिक व्रत किंवा उपाय करण्यापूर्वी कृपया तज्ज्ञ व्यक्तीचा किंवा गुरूंचा सल्ला अवश्य घ्यावा.)**

# मोरपंख आणि गीता उपायांनी उघडतील मोक्षाचे मार्ग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मातील सर्वात पावन आणि पुण्यदायी व्रतांपैकी एक म्हणून ओळखली जाणारी मोक्षदा एकादशी यंदा १ डिसेंबर २०२५ रोजी साजरी करण्यात येणार आहे. मार्गशीर्ष महिन्याच्या शुक्ल पक्षात येणारी ही एकादशी स्वयं'मोक्ष प्रदान करणारी' असल्याने याचे विशेष महत्त्व मानले जाते. या दिवशी भगवान विष्णूची उपासना, उपवास आणि काही विशिष्ट उपाय केल्यास जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्ती मिळते, अशी मान्यता आहे. धर्मग्रंथानुसार, या दिवशी केलेली पूजा, दान आणि साधना व्यक्तीच्या जीवनातील नकारात्मकता दूर करून सुख-शांती आणि आध्यात्मिक प्रगतीला मार्ग दाखवतात.

**गीता जयंतीसोबत मोक्षदाचे विशेष योग**
यावर्षी मोक्षदा एकादशीसोबतच गीता जयंती देखील साजरी केली जाणार आहे. त्यामुळे या दिवशी श्रीमद्भगवद्गीतेचे विशेष पूजन आणि वाचन करण्याचे अधिक महत्त्व आहे.

### गीता उपाय

**गीता वाचन :** भक्तांनी शक्य असल्यास संपूर्ण गीतेचा पाठ करावा. वेळेअभावी किमान ११ वा अध्याय विश्वरूप दर्शन योग अवश्य वाचावा.

**गीतेचे दान :** मंदिरात किंवा ब्राह्मणाला श्रीमद्भगवद्गीतेचे दान करणे अत्यंत शुभ मानले जाते. हे ज्ञान आणि मोक्षमार्गाकडे नेणारे कर्म समजले जाते.

**विशेष भोग :** भगवान श्रीकृष्ण यांना तुलसी मिस्रीचा भोग अर्पण करताना गीतेतील एखादा उपदेश शांतपणे मनात म्हणावा.

### मोरपंखाशी जोडलेले शुभ उपाय

भगवान श्रीकृष्ण यांचे प्रतीक मानला जाणारा मोरपंख या दिवशी पूजेत महत्त्वाची भूमिका बजावतो.

**पूजा आणि ऊर्जा संतुलनासाठी :** पूजाघरात श्रीकृष्ण यांच्या मूर्तीसमोर एक किंवा तीन मोरपंख ठेवून त्यांना शुद्ध जलाने स्वच्छ करून धूप-दीप दाखवावे. घराच्या मुख्य द्वारावर मोरपंख लावल्याने नकारात्मक ऊर्जा नष्ट होते आणि सकारात्मकता वाढते, असे मानले जाते.

**धनप्राप्तीसाठी :** एकादशीच्या पूजनानंतर मोरपंख तिजोरीत ठेवण्याची प्रथा आहे. यामुळे माता लक्ष्मी प्रसन्न होतात आणि आर्थिक स्थितीत सुधारणा होते, अशी श्रद्धा आहे.

**मोक्षदा एकादशीची पूजा पद्धत :** एकादशीच्या सकाळी लवकर उठून स्नान करून पिवळ्या वस्त्रांनी सजणे शुभ मानले जाते. भगवान विष्णू आणि श्रीकृष्णाची पूजा करताना पिवळी फुले, धूप, दीप, फल आणि तुलसीपत्र अर्पण करावे. भक्तांनी शक्य असल्यास कठोर उपवास पाळावा किंवा फक्त फलाहार करावा. पुढील दिवशी म्हणजे द्वादशीला ब्राह्मणांना भोजन देऊन, दान करून व्रताचे पारण केल्यास पुण्य अनेक पटींनी वाढते, असे धार्मिक मान्यतेत नमूद आहे.